पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ६

**सभावृत्तांत**

दिनांक :- १८ / ०७ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - १८/०७/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती

२) मा. पांढरकर निलेश शंकरराव

३) मा. काळभोर वैशाली जालिंदर

४) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा. कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक १ :- कै. कैलास पांढरकर व्यायामशाळा मानधन तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा. निलेश पांढरकर, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

----------

दिनांक २०/०६/२०१२ व ०४/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -</u>

ठराव क्रमांक :- १६ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १८/०७/२०१२
सुचक :- मा. निलेश पांढरकर अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा. निलेश पांढरकर, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक १६ मधील कै. पांडूरंग काळभोर सभागृह येथे कै. कैलास पांढरकर व्यायाम शाळा असून ती मानधनावर श्री तुळजामाता महिला बचत गटास चालविण्यास देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/१००९/२०१२
दिनांक :- १९/०७/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.